अभिव्यक्ति माध्यमांची शोभायमान दीपावली

डॉ. उषादेवी विजय कोल्हटकर

रविवार २८ ऑक्टोबर २००७ रोजी महाराष्ट्र मंडळ, न्यूयार्क - संस्थेने, ज्ञानदेवता गणरायाच्या अंगणात, अत्यंत आनंदोत्साहाने दिवाळी-सण साजरा केला. समयसापेक्षतेच्या सिध्दांताबद्दल ऐकले होते पण त्या संकल्पनेचा अनुभव घेतला नव्हता. कांही क्षणांच्या विस्तारामध्ये, केवढे व्यापक अनुभव - विश्व सामावू शकते याचा प्रत्यक्ष अनुभव ज्यांनी दिला त्या श्री. सुनील नाईक त्यांचे सहयोगी, स्थानीक बालकलाकार व मयूर देवल कलापथकातील सर्व कलाकारांचे त्रिवार अभिनंदन, त्यांच्या कलेला व परिश्रमांना अभिवादन व सर्व संबांधितांचे मनःपूर्वक आभार

देवालयाच्या रंगमंदिरातील सजावटीत दिवाळीच्या प्रतिकांची लयलूट होती. रंगमंच प्रकाशयोजनेला, आकाशदिव्याच्या सौम्यतेने आगळे परिमान दिले होते. अत्तर - सौरभित ठेवणीतील वस्त्राभूषणांना खास हास्याची जोडही होती. एकूण वातावरणनिर्मिती झकास झाली होती. सौ. गीता टोपे यांच्या दिग्दर्शनाचा हात धरुन, कुमारवयीन मराठी मुलांचा भारतीयता जपण्याचा अभिनिवेश विविध गुण दर्शनाची घुंगर बांधून रंगमंचावर धावत आला, जणू कांही कार्यक्रमाच्या बहारदार आरंभात, कोवळ्या उन्हाची किरणे सामावली होती. कौतुकाच्या नजरांनी बालगोपालांच्या कलेला, टाळ्यांचा कडकडाट करुन सलामी दिली. कांहीच्या नेत्री दाटलेल्या आनंदाश्रूंनी मनोमन या लहानग्यांची दृष्ट देखील काढली. श्रीयुत बागूलांच्या “ये मेरे वतन के लोगो” या गीताने जाणीवेच्या अश्रूंना आव्हान केले तर डॉ. नरसिंह कामतांच्या सुमधुर बांसरीवादनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

गणेश - मंदिराच्या अंगणात “रंगदीप” दिवाळी अंकाचे प्रकाशन, या योगाची सुषमा सर्वांना निश्चित भावली असावी. तसे पाहिले तर, महाभारताच्या काळी व्यास व गणेशाचे नाते लेखक व प्रकाशकाचेच होते. श्री. सुनील नाईकांच्या समयोचितपणाला काय उपमा द्यावी या विचारात असतानाच “रंगदीप” प्रकाशन संपन्न झाले. संपादिका सुषमा येरवडेकर, सहसंपादिका छाया आराणके यांच्या संपादनकुशलतेचे ‘लोकार्पण’ भारतीय दूतावास, Deputy Consule General न्यूयॉर्कचे श्री. अभय गोंडाणे यांनी केले. महाराष्ट्र मंडळाच्या कार्याचे कौतुक करुन मराठी अस्मिता जपण्याच्या प्रयत्नांची रास्त दखल घेत श्री. अभय यांनी मदतीचे आश्वासन देत, मनीचा आनंद व्यक्त केला. बौध्दिक तहानभूक भागविणारा ‘रंगदीप २००७’ अंक हातात, दिवाळीच्या फराळाची चव ओठावर व ‘मराठी व्यक्तिंचा समुह’ म्हणून एकीने जगण्याचे समाधान चेहऱ्यावर घेऊन सर्व रंगमंदिरात परतले व कार्यक्रमाचा उत्तरार्ध सुरू झाला.

लेखक, दिग्दर्शक श्री. मयूर देवलनिर्मित “मनात नाचते मराठी” या मराठी - आस्मिता दर्शनाच्या विविधरंगी कार्यक्रमाचे, शब्दातीत रुप, इतके देखणे होते की श्रोत्यांचा मन - मयूर पिसारा फुलवुन नाचू लागला. “नांदी” पासुनच ब्रम्हानंदी समाधी लागावी असा भव्य दिव्य कार्यक्रम सादर करणाऱ्या देवलांना व त्यांच्या साथीदारांना आम्हासर्वांचा, मानाचा,

त्रिवार मुजरा. जेजुरीच्या खंडोबाचा जागर जागवित, गोंधळी, गणपती बाप्पाच्या चरणी जाऊन पोंचले, संत, पंत, तंत कवींच्या भक्तिरसात, पोवड्याच्या आवेशात भिजून चिंब झाले. माहेरवासिनी, मनाच्या माहेरी येऊन विसावल्या. झिम्मा, फुगड्या खेळत हसल्या, नाचल्या व रुसल्या माणिक, मोती लुटण्याच्या अविभवित दर्याकिनारी जाऊन पोचलेली कोळीगीत, घुंगर बांधुन असा अंदाजात नाचली की अटलांटिक सागरकिनारी उभी असलेली मराठी मंडळी आनंदभरतीच्या लाटांनी भिजून चिंब झाली व युवकांचा तांडा, बालगोपालांचा मेळा "गोविंदा आला रे आला" या जल्लोषात मदहोष झाला. ढोलक्यावर थाप पडली, घुंगरांच्या झणकारांची लय वाढली, बुट्टेदार रेशमी पदरांची सळसळ जाणवली व लावण्यमयी नृत्यांगनांनी "लावणी" ची मिजास राखीत, या बहारदार कार्यक्रमांची नखरेबाज सांगता केली. लोकगीते, लोकनृत्य, प्रथा, परंपरा, भक्तिगीतांची जपणूक करणारा, हा सत्तर कलाकारांचा जथा, दमला, श्रमला पण आपल्या संचिताचे वैभव - दर्शन घडवित, महाराष्ट्र अस्मितेची शान राखीत धन्य, धन्य झाला. लेखन, दिग्दर्शन, नेपथ्य, निवेदन, अभिनय, नृत्य - कौशल्य व सत्तर कलावंताचे सामूहिक ऐक्य सारेच दर्जेदार, सुसूत्र, सुनियोजित व तारीफे काबील.

२८ ऑक्टोबर २००७ या सुदिनी खऱ्या अर्थाने अभिव्यक्ति माध्यमाची दिवाळी साजरी झाली. श्री. मयूर देवल यांच्या मोरपंखी निर्मितीतील, विरासत जपण्याच्या संवेदनशीलतेला अनुभवून मी सुखावले कारण -

श्वास, निश्वास मराठी<br>
भक्ति, शक्तिही मराठी<br>
जगू आम्ही तुझ्यासाठी<br>
तूच माय गे मराठी -